निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१५ वा.
बुधवार -०८ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247



## रस्ता दुतर्फा अवैध वृक्षतोड

**-परवानगी नसलेल्या डेरेदार वृक्षांचीही सर्रासपणे तोड सुरू -जरंडी ते फर्दापूर रस्त्यावरील प्रकार**

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/प्रतिनिधी**/ सोयगाव-चाळीसगाव रस्त्याच्या दुहेरी कामासाठी सर्रास जरंडी , कंकराळा ते फर्दापूर गावाकडे जाणाऱ्या रस्त्या लगतच्या शेतकऱ्यांच्या बांधावरील डेरेदार वृक्षांची संबंधित ठेकेदार कत्तल करत असल्याचा प्रकार मंगळवारी शेतकऱ्याने वनविभागाच्या निदर्शनास आणून दिला दरम्यान रस्त्या लगतच्या परवानगी नसलेल्या डेरेदार वृक्षांची संबंधित ठेकेदार शे . वकिल व बहुलखेडा येथील सिराज पठाण दिवसा ढवळ्या कत्तल करत आहे आणि विना नंबर चे ट्रॅक्टर , ट्रक क.एम एच १८ जी बी ७६९४ च्या साह्याने विल्हेवाट लावणं आहे. या प्रकाराकडे सोयगाव वनविभागाकडे तीन दिवसांपूर्वी च वनसमितीचे अध्यक्ष अनिल महाजन यांनी सोयगाव वनविभागाकडे माहिती दिली होती, परंतु वनविभागने या मागणीला दाद दिली नव्हती अखेर जरंडी येथील शेतकऱ्याने परवानगी नसलेल्या झाडांची कत्तल करतांना मंगळवारी रंगेहाथ पकडले त्यामुळे वनविभागाची चांगलीच धांदल उडाली होती. सोयगाव-बनोटी रस्त्यावर लागून प्रकाश गोरे यांचे शेत आहे संबंधित ठेकेदाराने या शेतकऱ्याच्या चक्क बांधावरील मोठे डेरेदार झाडाची मशीनच्या सहाय्याने कत्तल केली मात्र वेळीच शेतकऱ्याने घटनास्थळी धाव घेवून हा प्रकार थांबविला मात्र तोपर्यंत चार ते पाच डेरेदार वृक्षांची पूर्णपणे कत्तल झाली होती वनविभागाकडे तीन दिवसांपूर्वीच अनिल महाजन यांनी हा कानावर घातला होता परंतु वनविभागाने दाद न दिल्याने ठेकेदाराने परवानगी नसलेल्या अनेक डेरेदार वृक्षांची कत्तल केली आहे या प्रकाराला सोयगाव वनविभाग खतपाणी घालत असल्याचा आरोप शेतकरी प्रकाश गोरे यांनी केला असून जरंडी गावाजवळ कत्तल करून रस्त्यावर आडवे पडलेल्या सर्वच वृक्षांची चौकशी करावी अशी मागणी गोरे यांनी केली आहे.




# खरडून गेलेल्या जमिनीला हेक्टरी ३.५० लाख

**अति वृष्टीग्रस्तांसाठी ३१ हजार ६२८ कोटीचं पॅकेज जाहीर**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/ राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मदतीची अपेक्षा लागली असून आजच्या मंत्रिमंडळ बैठकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. विशेष म्हणजे आजच शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेजची घोषणा होणार असल्याची माहिती होती, दिवाळीपूर्वीच बळीराजाच्या खात्यावर मदतनिधी जमा होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी सांगितले होते. दिवाळी सणाला अवघे काही दिवस राहिल्याने आता राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्तांसाठी हेत. त्याच पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी मोठ्या पॅकजेची घोषणा केली असून सर्वांनाच मदत होईल, असे प्रयत्न सरकारचे या पॅकेजमध्ये दिसून आले आहेत. शेतकरी, नुकसानग्रस्त घरे, जमिनी आणि जनावरांच्या नुकसानीसाठीही भरीव मदत देण्याचा शासनाचा निर्णय आहे. शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेलं हे आत्तापर्यंतचं सर्वात मोठं पॅकेज आहे. शेतकरी रब्बीचे पिक घेतोय की नाही हे विचारत न घेता आम्ही १० हजार रुपयांची मदत करत आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### जनावरे आणि घरासाठीही मदतनिधी

-दुधाळ जनावरांना ३७ हजार रुपयांपर्यंत मदत
-गाळ भरलेल्या विहिरींसाठी ३० हजार
-कुकुटपालनाला १०० रुपये प्रति कोंबडी
-नष्ट, पडझड झालेली घरं नव्याने बांधण्यासाठी मदत
-डोंगरी भागातील घरांना १० हजारांची अधिकची मदत
-झोपड्यांची मदत, गोठा, दुकानदार यांना ५० हजार मदत करणार
-विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी करणार
-पीक नुकसानभरपाई
-शेतकऱ्यांना रब्बीचे पीक घेता आले पाहिजे यासाठी प्रति हेक्टरी १० हजार रुपये
-हंगामी बागायती शेतीनुकसान भरपाई - हेक्टरी २७ हजार रुपये
-बागायती शेती नुकसान भरपाई - हेक्टरी ३२ हजार रुपये
-विमा व्यतिरिक्त शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपये
-कोरडवाहू शेतकऱ्यांना ३५ हजार
-बागायती शेती ज्यांनी विमा उतरवला असेल त्यांना ५० हजारांहून अधिक मदत मिळेल.




अखेर मदतीचं पॅकेज जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्र्यांनी मदत पॅकेजची घोषणा केली. त्यानुसार, ज्या शेतकऱ्यांची जमीन अतिवृष्टीच्या पाण्यात वाहून गेली, त्यांना हेक्टरी ३.४७ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. तसेच, अतिवृष्टीग्रस्तांसाठी तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मदतीचे पॅकेज जाहीर करण्यात आलं आहे.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी अतिवृष्टी पाहणी दौरा केला, तेव्हापासून मदतीच्या पॅकेजची लवकरच घोषणा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. त्यातच, राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी विरोधकांकडून होत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही हीच मागणी केली असून महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी करत आ-

तसेच, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज सकाळीच फोन केला. विम्या संदर्भात बैठक घेत तातडीनं योग्य मदत दिली पाहिजे यासाठी सरकार दबाव आणेल, व्हॅलिडेशनसाठीही आता आपण प्रयत्न करतोय. शेतकऱ्यांना मदत करायची आहे तर ताण सहन करावा लागेल, इतकी अतिवृष्टी होईल याची कल्पना नव्हती. काही बाबींवर ताण सहन करावा लागेल, आत्ताच सांगता येत नाही. पण, शेतकऱ्यांना तात्काळ पैसे देणं सुरु करतोय, कुठे कमी करायचं आणि वाढवायचं हे डिसेंबरच्या अधिवेशनात बघू, असेही फडणवीसांनी म्हटलं.

**२५३ तालुक्यांना सरसकट मदत**

राज्यात अतिवृष्टीमुळे ६८ लाख हेक्टर इतक्या जमिनीवरील पिकांचे नुकसान झालं आहे, साधारणपणे जास्तीचं नुकसान २९ जिल्ह्यात झालं असून आपण २५३ तालुके सरसकट घेतले आहेत. त्यामध्ये, २ हजार ५९ मंडळं आहेत, जिथं ६५ मिमीची अट ठेवलेली नाही. त्याठिकाणी सरसकट मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. येथे सर्व प्रकारची मदत करण्याचा प्रयत्न आपण करतोय, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**दिवाळीआधी पैसे देण्याचा प्रयत्न**

मराठवाड्यातील परभणी, वाशिम, जालना, यवतमाळ या जिल्ह्यात ५० टक्क्यांहून अधिक नुकसान झालं आहे. संभाजीनगरमध्ये ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान आहे, तर सोलापूर धाराशिवमध्ये ८० टक्क्यांहून अधिकचं नुकसान आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पैसा दिवाळी पैसे आधी देता येईल, यासाठी प्रयत्न राहिल. मृत व्यक्तींचे सहाय्य आधीच दिले आहेत. काही गोष्टी ज्या राहिल्या आहेत, त्या दिवाळी आधीच देण्याचा प्रयत्न करणार आहोत. जवळपास १८ हजार कोटींपेक्षा अधिक पैसे क्रॉप कम्पेन्शेसनमधून आम्ही देतोय. चार पैसे आम्ही कमी खर्च करु आणि मदत करू, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. तसेच, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आम्हाला पैसे दिले आहेत, काहींनी सीएसआर देण्याचे मान्य केले आहे. शिक्षणाचा प्रश्न निर्माण होऊ नये ते यातून खर्च करू असा प्रयत्न राहिल, अशी माहितही फडणवीसांनी दिली.

**जमीन वाहून गेलेल्यांना हेक्टरी ३.४७ लाख रुपये**

राज्यात मराठवाड्यासह विविध जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीग्रस्तांसाठी राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ४७ हजार रोख नुकसान भरपाई आणि हेक्टरी ३ लाख नरेगाच्या माध्यमातून देण्यात येईल. त्यामुळे, जवळपास हेक्टरी साडेतीन लाख रुपये मदत शेतकऱ्यांना मिळणार आहे.

### ही अंतिम मदत नाही, टोकाचं पाऊल उचलू नये

शेतकऱ्यांसमोरील संकट मोठं होतं, प्रत्यक्ष बांधावर जात आम्ही नुकसान पाहिलं. त्यामुळे, तात्काळ १० हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. जवळपास ६५ लाख हेक्टर जमीन नुकसानग्रस्त झाली आहे. शेतकऱ्यांवरील संकट मोठं होतं, आम्ही इतका मोठा पाऊस पाहिला नाही. प्रसंग मोठा होता, अशात आमच्या बैठका झाल्या आणि महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी राहिले आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

### काही राहून गेलं तर समावेश करू - अजित पवार

दोन हेक्टरपर्यंत एनडीआरएफ आणि केंद्राचे नॉर्म्स असतात, त्यावरील भार आम्ही उचलला आहे. बारकाईने विचार करत कोणताही घटक वंचित राहणार नाही असा विचार केलाय. भौगोलिक परिस्थिती वेगळी असते, जर काही राहून गेलं तर त्याचा समावेश करण्याची देखील आमची तयारी आहे, अशी माहिती यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



### हंबरडा मोर्चाच्या तयारीसाठी फर्दापूर -सावळदबारा सर्कल भेटी

**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा/प्रतिनिधी**/छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात निघणाऱ्या हंबरडा मोर्चाच्या तयारीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांनी सोयगाव तालुक्यातील फर्दापूर -सावळदबारा सर्कलमधील गावांना भेटी दिल्या आहेत यावेळी शेतकरी व ग्रामस्थ हजर होते फर्दापूर. वरखेडी, सावळदबारा, घाणेगाव, मोलखेडा, देव्हारी, पिपळवाडी, महालब्धा, डाभा, नांदातांडा, रवळा, जवळा, जामठी,आदी गावाना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांनी भेटी दिले आहेत.यावेळी शेषराव पाटील, एकनाथ सपाटे, दिनकर शिपल्कर आदी होते.

## अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे गतीने पूर्ण करा-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**विभागीय आयुक्तांकडुन नुकसानीचे पंचनामे व मदत वाटपाचा आढावा**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे, डीबीटीद्वारे नुकसान भरपाई वाटप, केरोसीन, धान्य वाटप, वाळु धोरण अंमलबजावणी व सेवा पंधरवाडा याबाबतचा आढावा घेतला. अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे गतीने पूर्ण करा, शासनाने यापूर्वी वितरित केलेली मदत शेतकऱ्यांच्या थेट खात्यात जमा करण्याची कार्यवाही तत्परतेने करा, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात दुरदृष्य प्रणालीद्वारे विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी आज जिल्हानिहाय आढावा घेतला. यावेळी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दुरदृष्य प्रणालीद्वारे तर बैठकस्थळी अपर आयुक्त डॉ.अनंत गव्हाणे, अपर आयुक्त श्रीमती मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री.पापळकर म्हणाले, नैसर्गिक आपत्तीत शेतकरी तसेच नुकसानग्रस्तांना वेळेत मदत मिळाली पाहिजे, यासाठी झालेल्या नुकसानीचे पंचनामे गतीने पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई डीबीटी प्रणालीद्वारे त्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येणार असल्याने याबाबतची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी. शेती पिकांच्या नुकसानीसोबतच खरडून गेलेल्या जमिनीचे स्वतंत्र पंचनामे करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही पूर्ण करावी. ग्रामीण भागात रस्ते, पुल यासह ज्या विभागाच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे त्यांनी आराखडा तयार करून आपल्या विभागाच्या सचिवाकडे पाठवावा, असे निर्देश त्यांनी दिले.

नैसर्गिक आपत्तीत जिल्हानिहाय धान्य वाटपाचे नियोजनाचा त्यांनी आढावा घेत ही प्रक्रिया गतीमान करा, असे निर्देशपापळकर यांनी दिले. तसेच नविन वाळु धोरणाच्या अंमलबजावणीबाबत या बैठकीत चर्चा झाली. घरकुल व इतर शासकीय योजनांसाठी वाळुची उपलब्धता सुनिश्चित करावी असे निर्देश त्यांनी दिले.सेवा पंधरवाडा या उपक्रमाचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. सेवा पंधरवाड्याच्या माध्यमातून केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा अहवाल विहित कालमर्यादेत सादर करा, असे निर्देश श्री.पापळकर यांनी दिले.



छत्रपती संभाजीनगर विभागात आतापर्यंत जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीतील १६६८६१७.५ हे. जमीनीचे पंचनामे करण्यात आले असून १४१८९६.८० लक्ष निधी सुध्दा प्राप्त झालेला आहे व निधी वितरणाची प्रक्रिया सुरू आहे त्यापैकी २१७.४२ कोटी इतका निधी शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.


सप्टेंबरमध्ये झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे ७६ टक्के पूर्ण झाले असून, उर्वरित पंचनाम्याचे काम गतीने सुरू आहे. सदर काम तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिल्या.धान्य वितरणाबाबत ३३ हजार ४३ बाधित कुटूंबाना धान्य वितरीत केले असून, उर्वरीत लोकांना सुध्दा धान्य वाटपाचे काम सुरू आहे.सेवा पंधरवडा या उपक्रमामध्ये अतिवृष्टी व पावसामुळे जिल्हाधिका-यांना प्रभावीपणे काम करता आले नसले तरी पुढील १० दिवसांत सेवापंधरवड्याचे उर्वरीत काम पूर्ण करण्याबाबत सूचनाही पापळकर यांनी दिल्या.जिल्हानिहाय जिल्हाधिकारी महोदयांनी आपल्या जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे, मदत वाटपाची सद्यस्थिती याबाबत माहिती दिली.

## केज येथील सह दुय्यम निबंधक कार्यालय बनले दलालाचा अड्डा

**दस्त नोंदणीसाठी घेतले जातात हजारो रुपये, गरीब जनतेला लुबाडणाऱ्यांचा बंदोबस्त करावा नागरीकांची मागणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी**/ केज शहरातील सह दुय्यम कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाला असुन दस्त नोंदणीसाठी गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्यांचा सपाटा चालु असुन गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्या दलालांचा व संबंधित कर्मचारी यांचा बंदोबस्त करुन सर्व सामान्य जनतेला न्याय मिळावा अशी मागणी पक्षकारांकडुन केली जात आहे.याबाबत सविस्तर बातमी अशी की,शेत जमिनी अथवा घर जागा खरेदी विक्री करण्यासाठी शासनाने निर्धारित केलेले मुल्यांकन भरुन शासन नियमानुसार विविध कागदपत्रांची पूर्तता करुन दस्त नोंदणीसाठी प्रक्रिया केली जाते.शासन निर्णया प्रमाणे नियमानुसार पुर्ण फिस भरणा करुनही दस्त नोंदणीसाठी हजारो रुपये दलालांच्या मध्यस्थीने कर्मचारी घेत आहेत. शासनाचा पगार असताना सुद्धा सर्व सामान्य जनते कडुन अतिरिक्त पैशाची मागणी केली जात आहे. मुल्यांकन काढुन दिले जात असताना ही डील केली जाते व व्यवहार पुर्ण झाल्यानंतर हा व्यवहार केला जातो.ही प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली जाते.भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी घोषणा केली होती की, न खाउंगा न गाने दुंगा परंतु या घोषणेला हरताळ फासला जात असुन आमचे कोणीही काहीच करु शकत नाही अशा आविर्भावात दलाल व कर्मचारी वावरत आहेत तरी यांच्या व नातेवाईक यांच्या मालमत्तेची चौकशी करून आर्थिक व्यवहार तपासणी व्हावी अशी मागणी केली जात आहे.



# ...म्हणून सगळं विसरुन दोन्ही पवार एकत्र येणार का?

राज्यामध्ये पुढील काही आठवड्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. मात्र या निवडणुकींमध्ये काही वेगळे आणि आश्चर्याचा धक्का देणारे प्रयोग पाहायला मिळतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. अशाच एका शक्यतेनुसार साधारण अडीच वर्षांपूर्वी पक्षात फूट पडून वेगळ्या झालेल्या अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीतील विशेष बाब म्हणजे महायुतीमधील घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांचे बालेकिल्ले स्वबळावर लढवण्याचा तिन्ही पक्षांचा विचार आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नागपूर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं ठाणे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पुण्यामध्ये स्वबळाचा प्रयोग केला जाणार असल्याची माहिती मिळत आहे. असं असतानाच आता यापैकी एका ठिकाणी पवार काका-पुतण्या एकत्र येणार असल्याची चर्चा जोर धरु लागली आहे. यासंदर्भातील सूचक विधान एका खासदाराने केलं आहे.बारामतीच्या खासदार आणि शरद पवारांच्या कन्या तसेच अजित पवारांच्या भगिनी सुप्रिया सुळे यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. बारामती लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित कामाचा आढावा घेण्यासाठी सुप्रिया त्यांच्या काही सहकाऱ्यांसोबत महावितरणाच्या कार्यालयात आल्या होत्या. भोर, मुळशी, वेल्हा तालुक्यात सातत्याने वीज पुरवठा खंडित होतोय. दुर्गम भागात लोकांना आजही वीज मिळत नाही ही चिंत-ाजनक बाब असल्याचं यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या. पुणे महान-गर पालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी अजित पवारांना सोबत घेणार नसल्याचे स्पष्ट झालं आहे. त्यामुळेच दोन्ही राष्ट्रवादी पुणे शहरात पडद्याआडून छुपी युती करणार असल्याची जोरदार चर्चा आहे. यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांना पत्रकारांकडून थेट प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना सुप्रिया सुळेंनी ही शक्यता फेटाळून लावली नाही. या प्रश्नावर सुप्रिया यांनी सूचक उत्तर दिल्याचं पाहायला मिळालं.पुणे मनपात दोन्ही राष्ट्रवादी परस्पर सामंजस्याने एकत्र लढू शकतात, खरंच तसे काही चान्सेस आहेत का? असा सवाल सुप्रिया सुळेंना विचारण्यात आला. या प्रश्नावर सुप्रिया सुळेंनी, मी आत्ताच कसं यावर बोलू? कायकर्ते काय ठरवतील त्यावर चर्चा करू मग यावर बोलू, असं उत्तर दिलं.

# देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध - प्रवीण बागडे

मनुवादी विचारांचा वकील राकेश किशोर याने आज सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात 'सनातन का अपमान नही सहेंगे' म्हणत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर.गवई यांच्यावर बुट भिरकावल्याचा अत्यंत नीच प्रकार केला आहे.या निंदनीय प्रकाराचा जाहीर निषेध. देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून, भारतीय न्यायव्यवस्था, संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर झालेला गंभीर प्रहार आहे. या भ्याड कृत्याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. न्यायव्यवस्था हीच लोकशाहीची खरी हमी आहे आणि त्या व्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीवरच जर अशा प्रकारचा हल्ला झाला, तर तो संपूर्ण राष्ट्रासाठी चिंताजनक आहे. पाच हजार वर्षांपासून देशाला गुलाम केलेल्या या मनुवादी, वर्णवर्चस्ववादी व्यवस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून मुक्त केले. त्यामुळेच आज एक दलित सरन्यायाधीश न्याय व्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर विराजमान झालेले या मनुवाद्यांना सहन होत नाही. सरन्यायाधीश यांच्या मात-ोश्रींनी दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास नकार दिला होता.



लोकशाहीच्या पाया रचणाऱ्या प्रमुख खांबांमध्ये न्यायव्यवस्था ही सर्वात महत्त्व-ाची आहे. या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या सरन्यायाधीशांवरच जर हल्ला घडला, तर तो केवळ एखाद्या व्यक्तीवर झालेला आघात नसून, भारतीय संविधान, कायदा आणि लोकशाही व्यवस्थेवरच झा-लेला थेट प्रहार आहे. असा हल्ला हा न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा डागाळण्याचा, समाजात भीती आणि असुरक्षिततेचे वाता-वरण निर्माण करण्याचा, तसेच न्यायावरचा विश्वास डळमळीत करण्याचा कपटी प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयाचा परिसर जो देशा-तील न्यायमंदिर मानला जातो तिथेच अशा प्रकारची घटना घडणे हे अतिशय चिंताजनक आहे. हा देश संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधूतेच्या मुल्यांवर उभा आहे. संविधानाने दिलेल्या सामाजिक न्याय आणि समान संधीच्या तत्वामुळे मनुवाद्यांच्या पोटात मळमळ होत आहे. आज देशात उजव्या विचारांची सत्ता आहे, विषमतावादी आरए-सएस ने शतकपूर्ती केलेली आहे, अशा काळात एक दलित व्यक्ती न्यायपीठाच्या सर्वोच्च पदावर बसलेला या मनुवाद्यांच्या डोळ्यात खुपत आहे. लोकशाही शासनपद्धती आणि कायद्याचे राज्य या मनुवाद्यांना उल-थवून टाकून मनुवादी व्यवस्था पुनर्स्थापित करायची आहे. हेच त्यांच्या अखंड भारताचे स्वप्न आहे.

भ्याडपणे हल्ला करणाऱ्यांचा निषेध करणे पुरेसे नाही, तर अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा देणे हे न्यायव्यवस्थेप्रती खरी बांधिलकी ठरेल. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप आहे आणि हा संताप स्वाभाविकही आहे. कारण सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे देशा-तील सामान्य माणसाच्या हक्कांवर आणि सुरक्षिततेवर हल्ला होय. समाजाने, माध्यमांनी आणि सत्ताधाऱ्यांनी मिळून या प्रकरणात स्पष्ट व ठाम भूमिका घेतली पाहिजे. न्यायालयाची प्रतिष्ठा, संविधानावरील विश्वास आणि लोकशाहीचे रक्षण ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. या घटनेत सामील आर-ोपींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा दिली जावी, अशी आमची ठाम मागणी आहे. न्यायालयाचे गौरव, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांचे रक्षण करणे हे सर्वसामान्य जनतेचे, माध्यमांचे तसेच शासनाचे सामूहिक कर्तव्य आहे. सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे न्यायाच्या मंदिरातील शुद्धतेवर आघात! लोकशाहीत हा अपराध कधीच सहन केला जाणार नाही.

# भारताचा संरक्षण दलाचा मानबिंदू : भारतीय वायू दल

आज ८ ऑक्टोबर, दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्क्वाड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्क्वाड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसामुग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आ-हेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला ला-वले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली. भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# कुंभकर्णी सारखे झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी उध्दव ठाकरेंच्या शिवसेनेचे आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतुर / प्रतिनिधी/** गेल्या महिन्यात पावसाने घातलेल्या धुमाकूळने मराठवाड्यातील शेतकरी अक्षरक्ष देशोधडीला लागला असुन मराठवाड्यातील शेतकर्यांना या सरकारकडून मदतीची अपेक्षा आहे, परंतु सरकार हे कुंभकर्णी झोपेत असुन या कुंभकर्णी सरकारला जागे करण्यासाठी आज बुधवार दि.८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते १२.३० या दरमयान परतुर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर मराठवाडाव्यापी आंदोलन होणार असुन या आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाप्रमुख महेशभैय्या नळगे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात महटले आहे की, शिवसेना, युवासेना व महिला आघाडी चे सह संपर्कप्रमुख, जिल्हा अधिकारी, जिल्हासंघटक, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, युवा तालुकाधिकारी, महिला आघाडी तालुका संघटक, शिवसेना तालुका संघटक,



आजी, माजी, जिल्हापरिषद सदस्य, पं. स. सदस्य, बाजार समिती सदस्य आपणासर्वांना कळविण्यात येते की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार व युवा से-

**आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे-जिल्हा प्रमुख महेश नळगे यांचे अहवान**

नेचे मराठवाडा संपर्कप्रमुख धर्मराज दादा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उपनेते लक्ष्मणतात्या वडले व जालना जिल्हा प्रमुख महेश भैय्या नळगे यांच्या नेतृत्वात शेतकर्यांना संपूर्ण कर्ज माफी व हेक्टरी ५० हजार रुपये अर्थिक मदत मिळावी यासाठी विविध आंदोलन करण्यात येणार आ-हेत तसेच संपूर्ण मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसगट ५० हजार हेक्टरी मदत करावी व तसेच पीक विमयाचे कठीण निकष तातडीने शिथिल करून पंचनामयाची प्रक्रिया बाजुला ठेवत विमयाची रक्कम त्वरीत शेतकर्यांच्या खात्यात जमा करावी, अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरीकांना, जुने निकष न लावता, योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरीत देण्यात यावा या मागण्या घेऊन शिवसेनेने या मराठवाडाव्यापी आंदोलनाचे आयोजन आज दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ वार बुधवार रोजी सकाळी ११ वाजता परतुर उपविभागीय कार्यालयासमोर शिवसेनेच्या वतीने भव्य शेतकरी बांधवांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे . तरी या आंदोलनात शिवसैनिकांसह मतदारसंघातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उप-स्थित राहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख महेशभैय्या नळगे यांच्यासह पदाधिकार्यांनी केले आहे.

# करुणा सेवा ट्रस्टने दिला पूरग्रस्त भागा-तील कुटुंबाला मदतीचा हात

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** मागील महिन्यापासून मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे मराठवाड्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते. पुराच्या पाण्याने शेती पिकांचे मोठे नुकसान झाले तर अनेकांच्या घरात पाणी



शिरल्यामुळे नागरिक हतबल झाले होते त्यांना मदतीचा हात म्हणून मुंबई येथील करुणा सेवा ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून उदय चांदाराना यांच्या सहकार्याने बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देत जीवनावश्यक वस्तू व किराणा मालाचे वाटप करण्यात आले. संकटात सापडलेल्या पूरग्रस्त भागातील कुटुंबांना आधार देण्याचे समाजभान राखत मुंबई येथील युवा उद्योजक प्रशांत भैय्या गाडे यांच्या माध्यमातून बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात ब्लँकेट,चादरी, अन्न धान्य, तेल, बिस्किटे, फरसाणा ,चटणी,व अन्य गृहउपयोगी वस्तू ,औषधे, खाद्य पदार्थ वाटप करण्यात आले.यावेळी शिवप्रसाद ठोंबरे,अभिषेक भिसे,राहुल ठोंबरे,बप्पा भिसे,प्रदीप ठोंबरे,पोपट लांडगे,राजाभाऊ इटकर,शेळके अण्णा, आकाश ( भैय्या ) फरके, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण खोडसे,मारुती नवगण, पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता.

# मुक्त विद्यापीठ प्रवेशद्वार ते गोवर्धन गाव रस्त्याच्या दुतर्फा साडेचारशेहून अधिक सिल्व्हर ओक वृक्षलागवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अल्युमनी असोसिएशनतर्फे विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राच्या सहकार्याने सिल्वर ओक व बहावाची पाचशेपेक्षा अधिक वृक्षलागवड करण्यात आली.

विद्यापीठ प्रवेशद्वार ते विद्यापीठ फाटा गोवर्धन गावापर्यंत साधारण दोन किलोमीटर अंतरापर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा जवळपास साडेचारशे सिल्वर ओकची लागवड करण्यात आली. तसेच विद्यापीठ अंतर्गत परिसरात मैदानाभोवती ५० बहावाची लागवड करण्यात आली. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या वृक्षलागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की विद्यापीठ स्थापनेपासून परिसरात वनराई फुलवण्याचे - वृक्षसंपदा जतन करण्याचे कार्य विद्यापीठ करत आले आहे.

आजच्या या वृक्षलागवडीमुळे गोवर्धन गाव विद्यापीठ फाटा ते विद्यापीठ प्रवेशद्वार दरम्यान आता झाडांची देख-णी आरास बघावयास मिळणार आहे, जी पर्यावरण पूरक - पोषक सोबत वाटसरुंना मुबलक शुद्ध हवा व शीतल छाया प्रदान करणारी राहतील. बहावाच्या झाडांमुळे तर उन्हाळ्यात पिवळ्या धमक सुवर्णकांती फुलांनी विद्यापीठ परिसर अधिक नेत्रसुखद राहील, असे त्यांनी सांगितले.




प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी आजचे वृक्षारोपण हे विद्यापीठाचा विस्तार व परिवार वाढत असल्याचे प्रतिक असल्याचे सांगितले.

यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. नितीन ठोके, सेवा सुविधा प्रमुख सुनील निकम, उद्यान विभागाचे माधव माळी यांच्यासह विद्यापीठ अधिकारी - कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्राथमिक व माध्यमिक विद्यालय उमरी येथे आदित्य (दादा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** माऊली विद्यापीठ संचलित प्राथमिक व साहित्याचे वाटप , फळांचे वाटप तसेच विविध स्पर्धांचे आयोजन त्यामध्ये चित्रकला स्पर्धा, रांगोळी सत्वधर सर शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका डोंगरे मॅडम ज्येष्ठ शिक्षक चव्हाण सर ,मुळे सर ,मोरे सर,




माध्यमिक विद्यालय अशोक नगर उमरी यांच्या संयुक्त विद्यमानाने माऊली विद्यापीठाचे सचिव आदरणीय मा. आदित्य( दादा ) पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक स्पर्धा व त्यांचे बक्षीस वितरण उमरी ग्रामपंचायतचे सरपंच अमोल भैया मुळे ग्राम पंचायत सदस्य सुशेन मुळे , माध्यमिक शाळे-तील मुख्याध्यापक कांबळे सर व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक खामकर सर ,येळवे सर, इतापे सर लोंढे सर ,अडाणे मॅडम ,कुरे मॅडम ,रोडे सर इत्यादींच्या हस्ते करण्यात आले यावेळी शाळे-तील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# काशिनाथ खरमाळे यांचे 'गांडूळ खत निर्मिती प्रकल्पावर' मार्गदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पारनेर (प्रतिनिधी)** तालुक्यातील भांडगाव या गा-वातील आदर्श आणि प्रयोगशील शेतकरी अशी ओळख असलेले भांडगावचे सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ खरमाळे यांनी आपल्या शेतामध्ये 'गांडूळखत निर्मिती प्रकल्प' सुरू केला असून गेल्या सात वर्षापासून हा प्रकल्प उत्कृष्टरित्या चालवत आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून ते राज्यभरातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्व पटवून देत आहेत.

आपल्या 'प्रोजेक्ट साइटवर' अनेक कार्यशाळा घेत आहेत. गेल्या सात वर्षापासून त्यांचे हे काम अविरतरीत्या चालू आहे. आतापर्यंत हजारो शेतकऱ्यांना त्यांनी गांडूळ खत निर्मितीची प्रक्रिया अगदी सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत सखोल मार्गदर्शनाच्या माध्यमातून समजावून सांगितली आहे. फक्त महाराष्ट्रच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील कर्नाटक, तेलंगणा या राज्यातील शेतकरीही काशिनाथ खरमाळे यांच्या गांडूळखत निर्मिती प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी भेट देत आहेत. नुकताच कर्नाटक राज्यातील शेतकऱ्यांचा एक समूह गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाला भेट देण्यात आला होता.

अलीकडच्या काळामध्ये शे-तीचे झटपट उत्पन्न वाढवण्याच्या अट्टाहासापायी अनेक शेतकरी केमिकलयुक्त शेती करत आहेत. अगदी पिकाला सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत खते, तननाशके व इतर तत्सम औषधे हे पूर्ण केमिकलयुक्त असतात आणि याचेच दुष्परिणाम सर्वसामान्य



लोकांच्या जीवनावर दिसून येत आहेत. सर्वसामान्य लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक वेगवेगळ्या व्याधींनी लोक ग्रस्त झाले आहे. या सगळ्या आरोग्यविषयक समस्या लक्षात घेऊन आणि सेंद्रिय शे-तीचे महत्व ओळखून काशिनाथ खरमाळे यांनी आपल्या स्वतः च्या शेतामध्ये गांडूळ खत निर्मितीचा प्रकल्प सुरू केला आणि तो यशस्वीरित्या राबवला. राज्यातील इतर शेतकऱ्यांनी ही सेंद्रिय शेतीकडे वळावे हा उदात्त हेतू ठेवून त्यांनी आपल्या प्रकल्पावर राज्यभरातील शेतकऱ्यांच्या कार्यशाळा आयोजित केल्या. त्या माध्यमातून गांडूळ खतनिर्मिती कशी केली जाते याची सुरुव-ातीपासूनची प्रक्रिया प्रत्येक शेतकऱ्याला व्यक्तिगतरित्या त्या समजावून सांगितली.

त्यांच्या मार्गदर्शनाने आज महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक शेतकरी गांडूळ खत निर्मितीचे यशस्वी प्रकल्प राबवत आहेत. या प्रकल्पाबरोबर इतर प्रकल्प म्हणजेच मिश्र शेती, फळबाग शेती, कुक्कुटपालन, शे-ळीपालन परसबाग, मजल्याची शेती तसेच सेंद्रिय औषधे निर्मिती शेतीवर आधारित प्रकल्प ते राबवत आहेत. त्यांच्या पत्नी आणि भांडगावच्या माजी सरपंच सौ. सुनीता खरमाळे या बचत गटाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबन आणि आर्थिक बचतीचे तसेच महिलांना स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करत असतात.राज्यातील शेतकऱ्यांनी भविष्यातील आरोग्यसंदर्भात निर्माण होणारी धोकादायक परिस्थिती लक्षात घेता सेंद्रिय शेतीकडे वळावे असे आवाहन काशिना यानी केले आहे.

## संक्षिप्त

### डॉ.आंबेडकर सभागृहात पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** कौशल्य ,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने, देवगिरी शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थे जवळ असलेल्या वसतीगृहाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे बुधवार दि.८ रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. या रोजगार मेळाव्यामध्ये बीजी-ली-ईन इलेक्ट्रिकल्स लि., औरंगाबाद ऑटो न्सीलरी प्रा.लि., एलिगन कॉम्पोनंट प्रा.लि., एक्सल प्लेसमेंट, सुदर्शन सौरशक्ती प्रा.लि., शिवशक्ती ग्रोटेक लि., पगारीया ऑटो प्रा.लि., साई सुप्रिम इक्युपमेंट., नवभारत फर्टिलायजर, मायलन लेबॉरेटरी प्रा.लि., अलंकार इंजिनीअरींग ईक्युपमेंट प्रा.लि.., इत्यादी नामांकित नियोक्त्यांची उपस्थिती असेल. या मेळाव्यात कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक युवतींची आवश्यकतेनुसार निवड करण्यात येणार आहे. सर्व कंपन्या मिळून रोजगाराची ४७५ रिक्तपदे उपलब्ध असून विविध शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या ु.ेिक्षसरी. ारहरिुररा.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या ११ प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बुधवार दि.८ रोजी सकाळी साडे नऊ वाजता कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्यांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** महर्षी वाल्मिकी यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ तसेच अन्य अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

### मुदतबाह्य तुपाचा २ लाख ८९ हजारांचा साठा जप्त;अन्न औषध प्रशासन विभागाची कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सणासुदीच्या दिवसांत भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ बाजारात येऊ नयेत यासाठी अन्न व औषध प्रशासन (ऋऊ-) विशेष मोहीम राबवत आहे. या मोहिमेअंतर्गतसोमवारी (दि.६) अन्न व औषध प्रशासनाच्या छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने कारवाई करुन गोवर्धन तुपाचा २ लाख ८९ हजार ३८० रुपयांचा विक्री मुदत संपलेला साठा जप्त केला, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त (अन्न) द. वि. पाटील यांनी दिली आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर यांच्या पथकाने छत्रपती संभाजी नगर-मुंबई हायवे, करोडी, छत्रपती संभाजीनगर येथील पारीस मिल्क फूड्स लि. गट क्र. १९१ या ठिकाणी गोवर्धन गाईच्या तुपाचा साठा तपासला. या तपासणीत, १८.४ किलोग्रॅमचे ३६४.८ लिटर आणि १६.४ किलोग्रॅमचे ३८४.८ लिटर अशा एकूण १८२४ कागदी बॉक्समध्ये विक्रीसाठी ठेवलेला तूप साठा आढळून आला. या तुपाच्या साठ्याची वापर कालावधीची मुदत (एक्सपायरी) होऊन गेल्याचे तपासणीत उघड झाले. प्रशांत कुचेकर यांनी या साठ्यातील काही नमुने घेऊन उर्वरित २ लाख ८९ हजार ३८० रुपये किमतीचा साठा निकृष्ट दर्जाचा असल्याच्या संशयावरून जप्त केला आहे.

या प्रकरणी, पुढील कार्यवाहीसाठी जप्त केलेल्या तुपाचे नमुने अन्न विश्लेषण प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, त्यांच्या अहवालानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली. सहायक आयुक्त (अन्न), विवेक पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर क्षेत्रातील सर्व अन्न व्यावसायिकांना निकृष्ट व भेसळयुक्त पदार्थ तयार करू नयेत. तसेच ते ग्राहकांना विकू नयेत असे आवाहन केले आहे. सर्व व्यावसायिकांनी जनतेला निर्भेळ, स्वच्छ आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून द्यावे व नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला आहे.

# सर्वसमावेशक नियोजन करण्यावर भर द्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** नाशिक येथे २०२७ मध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त वेरुळ- घ्रुष्णेश्वर, पैठण या जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांवर पर्यटक येण्याची संभावना लक्षात घेता जिल्ह्यात विविध सुविधांची निर्मिती करण्यासाठी ८७१९ कोटी रुपयांचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात आला आहे.तथापि, हा आराखडा अधिक व्यापक, सुक्ष्म नियोजन युक्त व्हावा यासाठी लोकप्रतिनिधी, समाजातील विविध घटक, तज्ज्ञ व्यक्ति यांची मते व माहिती विचारात घेऊन सर्वसमावेशक नियोजन करण्यावर संबंधित विभागांनी भर द्यावा. सखोल नियोजन करुन आराखडा फेरसादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज नाशिक येथील कुंभमेळा विकास आराखड्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील विकासकामांच्या नियोजनाची बैठक पार पडली. मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस अध-ीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच सर्व विभागप्रमुख आदी उप-स्थित होते.सन २०२७ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्यानिमित्त लाखो भाविक, पर्यटक, साधुसंत हे महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देतील. त्यात जिल्ह्यातील वेरुळ आणि पैठण हे स्थळ महत्त्वाचे आहे. अंदाजे एक कोटी भाविक कुंभमेळा कालावधीत येतील असा अंदाज घेऊन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.त्यात प्रामुख्याने परिवहन व वाहतूक व्यवस्था, मुलभूत सुविधा, भाविक पर्यटकांची सोय व राहण्याची व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, ऐतिहासिक स्थळांचे जतन या महत्त्वाच्या बाबी विचाराधीन करुन सुविधांची निर्मिती करण्यात येणार आहे.



**पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या महत्त्वाच्या बाबी**

पर्यटकांचा ओघ नाशिक, त्र्यंबकेश्वर कडे असला तरी त्यानिमित्त पर्यटक नजिकच्या तीर्थक्षेत्रांना भेटी देतील. त्यात छत्रपती संभाजीनगर, शिर्डी ही विमानतळे असल्याने येथे देश- विदेशा-तील पर्यटक येऊन मग नाशिककडे जातील. या भागातील अजिंठा, वेरूळ, छत्रपती संभाजीनगर , पितळखोरा लेणी, घटोत्कच लेणी, दौलताबाद किल्ला तसेच बिबी का मकबरा, नहेर ए अंबरी, पाणचक्की, जायकवाडी धरण, गौताळा अभयारण्य अशा महत्वाच्या पर्यटक स्थळांकडे पर्यटकांचा ओघ वाढेल. महाशिवरात्री पर्वात दररोज दीड ते २ लाख पर्यटकांची हजेरी तर सिंहस्थ पर्वात ३ लाख पर्यटकांची दररोज हजेरी अपेक्षित आहे.या सर्व स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचा विकास करणे, प्रत्येक ठिकाणी पर्यटकांना लागणाऱ्या सुविधांचा विकास करणे, त्यादृष्टीने स्वच्छता, आरोग्य, परिवहन, सुरक्षा इ. सोई विकसित करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. याच आराखड्याचे आज सादरीकरण करण्यात आले.

**आराखड्याची वैशिष्ट्ये**

**वाहतुक व्यवस्थाः-** वाहनतळांसाठी १३० हेक्टर क्षेत्रावर पार्किंग आणि निवास व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले आहे. त्यात धुळे सोलापूर महामार्ग (समृद्धी महामार्ग लगत), धुळे सोलापूर महामार्ग (कन्नड लगत), खुलताबाद रस्ता (फुलंब्री कडील बाजू), छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग-५२ लगत अशा ठिकाणी ही पार्किंग स्थळे व निवास व्यवस्था निर्माण करण्यात येईल. तसेच रस्त्यांचे रुंदीकरण, डांबरीकरण, वन वे मार्ग, फेरी बसेस, धार्मिक स्थळांच्या जवळ ई- रिक्षा सेवा, बस स्थानकांवर रियल टाईम डिस्प्ले, आणीबाणीच्या कालावधीतील वाहनांसाठी (अग्निशमन वहने, रुग्णवाहिका, सुरक्षा दलाची वाहने इ.) राखीव मार्ग, डिजीटल वाहतुक व्यवस्थापनासाठी जीप-ीएस अनुकूल पथदिवे, वाहतुक सिग्नल्स, दिशादर्शक व सुचना फलक, ई. व्हेईकल पार्किंग व चार्जिंग स्टेशन्स इ.

भाविकांसाठी मुलभूत सुविधाः- स्वच्छता गृहे, स्त्री, पुरुष व दिव्यांगांसाठी स्वच्छता गृहांची निर्मिती व अस्तित्वात असलेल्या सुविधांची दुरुस्ती, पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, आर.ओ. प्लांट, टँकर व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा, माहिती केंद्र स्थापणे जेथून भाविक-पर्यटकांना माहिती व मार्गदर्शन मिळू शकेल. या शिवाय तीन लाख लोक राहू शकतील अशा क्षमतेची तंबू शिबिरे, धर्मशाळा दुरुस्ती करणे, अशा स्थळांजवळ व तीर्थक्षेत्रांजवळ अन्नक्षेत्र उभारणे हॉटेल व लॉजसाठी सल्लागार सेवा व त्यासाठी क्यू आर कोड बुकिंग सेवा,

**सुरक्षा व्यवस्थाः-** २४ तास निगराणीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे व ड्रोन द्वारे देखरेख, तात्पुरत्या पोलीस चौक्या उभारणे व नियंत्रण कक्ष स्थापित करणे, आपत्ती प्रतिसाद दल स्थापित करणे व अग्निशमन केंद्र, आरोग्य सेवा पथके सज्ज ठेवणे, महिला भाविकांच्या सुरक्षेसाठी हेल्पलाईन, महिला पोलिसांची पथके तैनात करणे, गर्दीच्या व्यवस्थापनासाठी बॅरिकेटींग, सेप्रेशन वॉल्स, सुरक्षा मार्ग इ. व्यवस्था करणे. अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंच्या सुरक्षेसाठी व्यवस्था करणे. त्यात हेलिपॅड उभारणी, विश्रामगृह इ.

**पर्यटन नियोजनः** वेरुळ लेणी व मंदिर सजा-वट व प्रकाश योजना, दर्शनाचे वेळापत्रक नियोजन करणे, अधिकृत मार्गदर्शन व बहुभाषिक माहिती, स्थानिक तीर्थक्षेत्र व्यवस्थापन, दर्शन वेळापत्रक रियल टाईम उपलब्ध करणे. मोफत वायफाय सुविधा, पर्यटकांसाठी माहितीचे प व पोर्टल्स तयार करणे, क्यू आर कोड व व्हर्च्युअल गाईड सुविधा. स्थानिक विक्रेत्यांना अधिकृत स्टॉल्स उपलब्ध करणे, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्थानिकांना रोजगार संधी निर्माण करणे.

**कचरा विल्हेवाटीचे नियोजन करा-जी. श्रीकांत**

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन सुविधांचा विकास करावयाचा आहे. यासंदर्भात आज बैठकीत चर्चा झाली. मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले की, पर्यटकांना पार्किंग, निवास,स्वच्छता गृहे, आहा गृहे इ. बाबत सर्वंकष माहिती असण-ारी मोबाईल प सुरु करावे. तसेच निर्माण होणारा कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पद्धतीने लगेचच करता यावी यासाठीची यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

**पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी तात्पुरते निवारे हवेत- पोलीस अधीक्षक डॉ. राठोड**

पोलीस अधीक्षक डॉ. राठोड म्हणाले की, पर्वणी कालावधीत बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलीस अधिकारी- कर्मचारी यांना तात्पुरती निवासस्थाने उपलब्ध करुन द्यावी लागतील. तसेच संदेशवहन उपकरणे, वाहने इ. व्यवस्था निर्माण करावी लागेल.

**सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर व्हावा- जिल्हाधिकारी स्वामी**

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, आरोग्य व्यवस्था, भाविकांची व महिलांची सुरक्षा, ज्येष्ठ/ दिव्यांग यांना दर्शनासाठी वाहन व्यवस्था उपलब्ध करणे, रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे दूर करणे, रस्ते सुरक्षा उपाययोजना राबविणे, सौर उर्जेचा अधिकाधिक वापर करणे (पथदिवे, प्रकाश व्यवस्था इ.) याबाबींचा या आराखड्यात समावेश करावा. तसेच या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक रहिवासी, विक्रेते, तज्ज्ञ, अभ्यासक यांचे म्हणणे विचारात घेऊन अंतिम प्रस्ताव लवकरात लवकर तयार करावा. आराखडा हा सर्वसमावेशक होण्याच्यादृष्टीने सुक्ष्म नियोजन करावे,असे निर्देश त्यांनी दिले.

### चिंचोली येथील कला महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताह संपन्न




**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील चिंचोली येथे शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिं. ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर मराठी विभागाच्या वतीने दि.७ड़१०ड़२०२५ रोजी अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ग्रंथालय विभागाचे प्रमुख डॉ योगेश भाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी भाषेला अभिजात दर्जा कसा प्राप्त झाला. याचे ऐतिहासिक पुरावे देऊन मराठी अभिजात भाषेचे महत्त्व सांगितले.या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनिता खंडागळे यांनी प्रास्ताविक करताना मराठी भाषेचा इतिहास सांगून मराठी अभिजात भाषेचे उद्दिष्टे सांगून विद्यार्थीना मराठी भाषा आपण जपली पाहिजे त्यातून उद्याच्या पिढीला आपल्या भाषेचे ज्ञान आणि संस्कृती समजली पाहिजे असे प्रतिपादन केले.प्रा. वंदना पाटील यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. तसेच या प्रसंगी डॉ. विक्रमसिंह पवार, डॉ. सुनिल काळे, डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. राजेश कांबळे, डॉ. संजय मगर, डॉ. संजय वाकळे, डॉ. वंदना बनकर, डॉ. प्रतिभा आघार्डे, प्रा. स्नेहा चौंडीय, प्रा. अमर केसरे, डॉ. अजिनात मनगटे, अनिल जंजाळ, कैलास पद्म, शेषराव मूरमुडे, दिलीप पवार लक्ष्मण मोरे, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छायाचित्र सुनिल निकम

## जड वाहतूक ही गंगापूर शहर मार्गे तात्काळ बंद करा नसतात रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/** गंगापूर शहरा-तुन गेल्या महिनाभरापासून अहिल्यानगर ते मनमाड मार्गावरील जड वाहतूक ही गंगापूर शहर मार्गे चालू असून शासनाने दिलेला पर्यायी मार्ग वापरण्याचा कालावधी संपूनही ही वाहतूक अजूनही सुरू आहे. या जड वाहनांच्या वाहतुकीमुळे गंगापूर शहरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान सहन करावे लागत आहे.




तसेच भेंडळा फाटा ते वैजापूर मार्ग अत्यंत खराब होत असून जड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे.

दुर्दैवाने,गेल्या पंधरवड्यात अनेक अप-घात होऊन काही नागरिकांचा मृत्यू झाला आहे, त्यामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः मुख्य रस्त्यावर व्यापारी वर्ग त्रस्त झाला आहे. या मार्गावर अनेक शाळा व महाविद्यालये असल्याने लहान मुलांच्या जीवितासही गंभीर धोका निर्माण झाला आहे.त्या अनुषंगाने, गंगापूर शहरातून जाणारी ही जड वाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे अहिल्यानगर-मनमाड मार्गावरील जड वाहतूक पूर्ववत मार्गाने चालू करण्यात यावी.अन्यथा, येत्या दि.१३/१०/२०२५ सोमवार पर्यंत योग्य ती कारवाई न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, गंगापूर तालुकाच्या वतीने तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल अशा इश-ारा निवेदनात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, गंगापूर तालुका अध्यक्ष संजय जाधव यांनी गंगापूर तहसीलदार यांना दिले आहे.

### लासुर स्टेशन येथे रेल्वे स्टेशनच्या कमानी परीसरात एक इसम गुप्ती तलवार घेऊन फिरत असताना पोलिसांनी पकडले रंगेहाथ

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी /** गंगापूर तालुक्यातील लास-ुर स्टेशन येथे रेल्वे स्टेशनच्या कमानी परीसरात गोपीनीय खबर्याने पोलिसांना माहिती दिली एक इसम गुप्ती तलवार घेऊन जात आहे .

अशी माहिती मिळतात शिल्लेगाव पोलिसांनी (गुप्ती) तलवारसह इसमाला रंगेहाथ पकडण्यात यश आले आहे.

हि कारवाई शिल्लेगाव पो-लीस ठाण्याचे निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशाने दि, ६ ऑक्टोंबर रोजी अंदाजे संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास शिल्लेगाव ठाण्याचे हद्दीत लासुर स्टेशन येथील रेल्वे स्टेशनचे कमानीजवळ एक इसम जा-हेद जावेद शाह वय १९ वर्ष रा. जहांगीर कॉलनी हर्सुल आ-पणा किराणा दुकान छत्रपती संभाजीनगर हा स्वतःच्या कब्जात विनापरवाना बेकायदेशीर रित्या



तलवार घेऊन फिरताना असताना बिट अंमलदार तात्याराव बेंद्रे राजेंद्र निसर्गे, पटेल, सुरेश भिसे यांनी रंगेहाथ पकडले यांनी छापा मारला असता सदर इसमाच्या ताब्यातील एक ३४ इंच लांबीची लोखंडी गुप्ती (तलवार ) मिळून आल्याने जप्त करण्यात आलेली असून पो. कॉ./राजेंद्र निसर्गे यांचे फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

### १३ ऑक्टोबर रोजी भूमि लोक अदाल-तीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भुमि अभिलेख विभागातील अर्धन्यायीक स्वरुपाचे कामकाज चालते. तथापि सदरचे विविध टप्प्यावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायीक प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने सदर प्रकरणांत संबंधितांना न्यायदानास विलंब होत आहे. तरी विविध टप्प्यावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायीक प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी भूमि लोक अदालत दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता भुमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, गणेश कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. तरी भूमि लोक अदालतीमध्ये आपली प्रकरणे तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन असे उपसंचालक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारणी कामाचा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडून आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल, दादर येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य स्मारक आणि पुतळ्याच्या कामाचा आढावा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतला. यावेळी आनंदराज आंबेडकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, समुद्राच्या शेजारी हे भव्य स्मारक साकारत आहे.

या ठिकाणी उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणीबाबत शिल्पकार राम सुतार यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांचा विचार करण्यात आला असून त्याबाबत संबंधित विभागास अवगत करण्यात आले आहे. पुतळ्याच्या तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पुतळा विहित वेळेत उभा करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा मानस असल्याचेही मंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव सविता चौधर, जिपचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) उदयसिंग राजपूत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, अन्न व औषध सहा. आयुक्त निखील कुलकर्णी, वैधमापनचे श्री. दराडे बीएसएनएलचे प्रदिपकुमार इंगळे, सहा. पोलीस निरिक्षक श्री. चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनीधी श्री. बोराडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे श्री. मुंढे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी डी.एस. दिवटे, यांच्यासह अशासकीय सदस्य सतिष पंच, रमेश पतंगे, विजय जाधव, जुमान बिन चाऊस, संजय देशपांडे, बाबासाहेब सोनटक्के, संदिप काबरा, शालीनी पुराणीक, अहेमद नुर शेख शरिफ, अनिल मुंदडा, ङ मधुकर सोनोने यांची बैठकीस उपस्थिती होती.

यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीमती मैत्रेवार यांनी, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारी त्वरित सोडविणे असल्याचे सांगितले. ग्राहकांच्या हितांचे संरक्षण व त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठीची हि बैठक असल्याने ग्राहकांच्या तक्रारींचे अर्ज या बैठकीत सादर करावेत. तसेच तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाशी संबंधीत राशन कार्ड वितरण, दुरुस्ती, नाव वगळणे ही कामे वेळेत करावी. याबाबत कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील राशन दूकानात स्वस्त धान्याचे दरपत्रकाचे फलक तसेच ग्राहकांना नियमानुसार किती राशन मिळते याचे दर्शनी भागात माहिती फलक लावावेत. जास्तीचे दर आकारणी करणाऱ्या विरोधात कडक कारवाई करावी. लाभार्थ्यांना ई-पॉस मशीनद्वारे नियमानुसार धान्य वितरीत करावे. स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर डिलीव्हरी करणारे कर्मचारी ग्राहकांकडून अतिरिक्त रुपयांची मागणी करतांना निदर्शनास आले असुन, यापुढे कोणीही ग्राहकाकडून अतिरिक्त रुपयांची मागणी केल्यास संबंधीतावर फौजदारी कारवाई करण्यात येणार. तसेच सद्या सण व उत्सावाचा कालावधी सुरु असुन, या कालावधीत भेसळयुक्त खव्याची विक्री होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खवा किंवा मिठाई विक्री करणाऱ्यांची अन् व औषध प्रशासनाने तपासणी करुन दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. महावितरणने वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करावे. सर्व संबंधीत विभागांनी त्यांच्याशी संबंधीत तक्रारींची दखल घेवून, याबाबत योग्य कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीमती मैत्रेवार यांनी दिल्या. यावेळी बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये राशन दूकानात धान्य वाटप केल्यास ग्राहकांना पावती मिळत नाही, घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक ठिकाणी वापर. गॅस वितरण कंपनीकडून घरगुती गॅस डिलिव्हरी करतांना ४० ते ५० अधिक रुपयाची मागणी, बदनापूर तालूक्यातील मौ. वाहेगाव येथील समस्या, जालना शहरातील नागरीकांना देण्यात येणारी चुकीच्या रक्कमेची वीज बिले, जालना शहरातील रस्त्यांवर बंद पडलेल्या इंटरनेटच्या केबल आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीस जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव सविता चौधर यांनी प्रास्ताविकात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे उद्दीष्ट सांगुन मागील बैठकीबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच ग्राहकांच्या संबंधाने काही अडचणी किंवा तक्रारी असल्यास, त्याकरीता जिल्हा पुरवठा विभागाने जिल्ह्याचे क्षरश्रपर.पळल. ळप या संकेतस्थळावर जिल्ह्यातील ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल (फॉर्म) सुविधा उपलब्ध करुन दिली असुन, नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर करव्यात असे आवाहन केले.

# विचार शुध्द असतील तर जीवन तणावमुक्त बनते-नारायणभाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** मानवाकडे आज बुद्धी, ज्ञान, माहिती सर्व काही आहे; पण मनःशांती नाही. छोट्या छोट्या गोष्टींमुळे ताण, नैराश्य, आणि आजार वाढताना दिसतात. हीच खरी आधुनिक जगाची शोकांतिका आहे. विचार शुद्ध असतील तर जीवन नक्कीच तणावमुक्त व निरोगी बनते आणि हाच 'राजयोग'चा सार आहे, असा हितोपदेश राजयोग एज्युकेशन फाउंडेशन व रिसर्च अंतर्गत धार्मिक प्रभागाचे झोनल कॉर्डिनेटर राजयोगी बी. के. नारायणभाई (इंदौर) यांनी येथे बोलताना दिला.

ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय केंद्र जालनाच्यावतीने सोमवार दि. ६ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहात आयोजित 'रोग व तणावमुक्त जीवन' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी बुऱ्हाणपूर सबझोन संचालिका ब्रह्माकुमारी मंगला दीदी, बुलढाणा सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी उर्मिला दीदी, भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष संध्या देठे, ब्राह्मण सभेचे उपाध्यक्ष रमेश देडकर, उद्योजक जगदीश राठी, उद्योजक राजेश बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती.

नारायणभाई पुढे म्हणाले की, आपलं शरीर हे पाच तत्वांपासून बनलेला एक भौतिक पुतळा आहे.पण, त्याला चालविणारी शक्ती म्हणजे आत्मा अर्थात एक जिवंत ऊर्जा. हीच ऊर्जा आपल्या विचारांना, भावनांना आणि कृतींना दिशा देते. समुद्र मंथनात जसं अमृत आणि विष दोन्ही बाहेर आलं, तसं आपल्या मनातही चांगले आणि वाईट विचार एकत्र निर्माण होतात. पण कोणते विचार स्वीकारायचे, हा निर्णय आपली बुद्धी घेते. जेव्हा मन, बुद्धी आणि संस्कार यांचं संतुलन साधलं जातं, तेव्हा जीवन खर्या अर्थाने तणावमुक्त होतं, असे ते म्हणाले.जेव्हा आपण नकारात्मक विचार करतो, तेव्हा तणाववर्धक हार्मोन्स तयार होतात आणि त्यामुळे ब्लडप्रेशर, डायबेटीज, मायग्रेन,



डिप्रेशन, हृदयरोग, अस्थमा यांसारखे आजार वाढतात. उलट, सकारात्मक विचार, ध्यान आणि राजयोग यांच्या साहाय्याने हे आजार नियंत्रित किंवा नाहीसे होऊ शकतात, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उर्मिला दीदी यांनी केले. सूत्रसंचालन श्याम शेलगावकर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार लक्ष्मीनारायण मानधना यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय जालना केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी शितल दीदी, ब्रह्माकुमारी अर्चना दीदी यांच्यासह विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला ज्ञानदेव पायगव्हाणे, सुषमा पायगव्हाणे, आर. आर. खडके, सुनील लाहोटी, कल्पना लाहोटी, डॉ. सतीश मोरे, भारती मोरे, परमानंद धनकानी, लक्ष्मीकांत कंकाळ, सुरजसिंग चौधरी, राम अंभोरे, देविदास लाखोले, राधेश्याम साबू, विना साबू, सतीश नरवडे, कविता नरवडे, औदुंबर बोधे, रसना देहेडकर, आशा मानधना यांच्यासह शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** राज्यात दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या काळात राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या विशेष आरोग्य अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानांतर्गत एकूण २,३०,६५३ आरोग्य शिबिरे घेण्यात आली, ज्यामध्ये ३,४१३ विशेष शिबिरांचा समावेश होता. या शिबिरांमध्ये तब्बल १ कोटी ८ लाख ५९ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, यापैकी ३२ लाख ७१ हजार पुरुष आणि ७५ लाख ८७ हजार महिला लाभार्थी ठरल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सेवा हाच संकल्प, भारत हीच पहिला प्रेरणा .... ७५ वर्षे' यानुसार राष्ट्रीय स्तरावर 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे विशेष अभियान देशात राबविण्यात आले. महाराष्ट्रात आरोग्य विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्त्रीशक्तीला आरोग्य शक्तीची साथ देण्यासाठी आणि महिला आरोग्य व सशक्तीकरणाला प्राधान्य देण्यासाठी 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान राबविले गेले. या अभियानांतर्गत महिला आणि बालकांच्या आरोग्य तपासणीसह विविध जनजागृती उपक्रम आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन जिल्हा आणि महापालिका स्तरावर करण्यात आले. या अभियानांतर्गत राज्यभरातील जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि महानगरपालिका स्तरावर आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये महिलांच्या असंसर्गजन्य आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, क्षयरोग व रक्तदाब तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, बालकांचे लसीकरण, पोषण व मासिक पाळी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात आले. याशिवाय रक्तदान शिबिरे, निक्षय मित्र नोंदणी मोहीम, आयुष्मान कार्ड वितरण, प्रधानमंत्री मातृ वंदना कार्ड वितरण आणि अंगणवाडी केंद्रांमार्फत पोषण जनजागृती उपक्रम राबविण्यात आले.



## महानगरपालिकेत खासदार डॉ. कल्याण काळे यांची आढावा बैठक - शहरातील विकासकामांना गती देण्याचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या अध्यक्षतेखाली जालना महानगरपालिका कार्यालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील विविध विकासकामे, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, तसेच तलावांच्या दुरुस्तीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत घाणेवाडी तलावाच्या दुरुस्ती व देखभाल संबंधी सूचना देण्यात आल्या. शासनाने या तलावाची मालकी महानगरपालिकेला दिल्याने आता मनपाच्या नावाने सातबारा उताऱ्यात इतर हक्कात नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे तलावातील गाळ काढण्याचे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे निर्देश खासदारांनी दिले.

तसेच मोती तलावाचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची सूचना करण्यात आली.अतिवृष्टीमुळे मोती तलावाचेव कुंडलिका - सीना नद्यांचे पाणी शहरात घुसल्याने नागरिकांचे व व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून सांडव्याचे काम तातडीने पूर्ण करावे व नद्या अतिक्रमण मुक्त कराव्या तसेच नॅशनल हायवे अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तलावाजवळील रस्त्याची उंची वाढवावी, असे निर्देश खासदार काळे यांनी दिले.यावेळी कुंडलिका व सीना नदीपात्रातील रेड व ब्लू लाईन मार्किंग, तसेच अतिक्रमण हटविण्याबाबत ठोस कारवाई करण्याची सूचना देण्यात आली.

शहरातील पथदिवे नियमित सुरू ठेवणे, मनपा व झालर क्षेत्रातील डी.पी. रोडवरील अतिक्रमण हटविणे, तसेच शहरातील ३०० हून अधिक ओपन स्पेसवरील अतिक्रमण काढून मनपाने ताबा घ्यावा, अशा सूचनाही देण्यात आल्या.रमाई घरकूल योजनेतील लाभार्थ्यांना निधी वेळेवर मिळत नसल्याने संबंधित अभियंत्यावर कारवाई करण्याचे निर्देश खासदारांनी दिले. तसेच जन्म व मृत्यू नोंदणीसाठी आकारले जाणारे प्रति वर्ष १०० रुपये शुल्क कमी करण्याबाबतही सूचना करण्यात आली. भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण, अतिक्रमण हटविणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा आणि पाणीपुरवठा नियमितता यांसारख्या विषयांवरही सविस्तर चर्चा झाली.

खासदारांनी सांगितले की, २ ते ३ महिन्यांत पुढील आढावा बैठक आयोजित करण्यात येईल, तोपर्यंत महानगरपालिकेने सर्व समस्यांवर समाधानकारक कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

या बैठकीस जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष भास्करराव आंबेकर, कल्याण दळे,नंदाताई पवार, बंदर भाई चाऊस, संजय सेठ मुथा, राजेंद्र गोरे, नरेंद्रजी मित्तल, रऊफ भाई परसुवाले,अंकुशराव राऊत,विनोद यादव,अकबर खान, इब्राहीम शेख,सीतारामजी अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. एस. एफ.शेख यांना जयशंकर प्रसाद आंतरराष्ट्रीय सन्मान पुरस्कार जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर (प्रतिनिधी)** बदनापूर येथील निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख डॉ. एस. एफ.शेख यांना हिंदी वाड्?मय क्षेत्रातील प्रतिष्ठेचा 'जयशंकर प्रसाद आंतरराष्ट्रीय सन्मान पुरस्कार' जाहीर झाला आहे. अक्षरज्ञान एज्युकेशन फाउंडेशन या संस्थेतर्फे दिला जाणारा हा पुरस्कार हिंदी दिवसाच्या औचित्याने प्रदान करण्यात आला. डॉ.शेख यांनी हिंदी विषयातील संशोधन कार्याबरोबरच, हिंदी भाषेचा प्रसार आणि विद्यार्थ्यांमध्ये या भाषेची आवड निर्माण होण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या अनेक संशोधन लेखांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळालेली आहे. ते भारतभर झालेल्या विविध हिंदी साहित्य संमेलनांमध्ये सक्रिय सहभाग घेत असून, अनेक संमेलने, परिसंवाद व कार्यशाळांमध्ये त्यांनी आपली शोधनिबंध सादर केले आहेत. तसेच अशा उपक्रमांच्या आयोजनामध्येही त्यांचा मोलाचा सहभाग असतो. डॉ. शेख यांच्या हिंदी भाषा समृद्धीसाठी असलेल्या योगदानाची दखल घेऊन अक्षरज्ञान एज्युकेशन फाउंडेशनने त्यांना या अंतरराष्ट्रीय सन्मानाने गौरवले.



पुरस्कार जाहीर करताना संस्थेने त्यांच्या अथक परिश्रम, साहित्यसेवा, उच्च शिक्षणातील योगदान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण घडामोडींसाठी घेतलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

या पुरस्कारामुळे डॉ. एस. एफ. शेख यांचे संस्थेच्या सचिव डॉ.एम.डी.पाथ्रीकर, अध्यक्ष, डॉ. देवेश दत्ताभाऊ पाथ्रीकर, डॉ. नाजमा खान,डॉ.एस.एस. शेख,डॉ. झेड.ए.पठाण, डॉ.गणेश गावंडे, डॉ. विजय राजाळे, डॉ.जीवनज्योती निकाळजे, डॉ. अतिक कुरेशी, प्रा.श्रीनिवास मुंगे,डॉ.संजयकुमार कांबळे, डॉ.एम. जी. उंडेगावकर, डॉ. अशोक मुंडे,डॉ.देवेंद्र देशमुख, डॉ. शेहजाद सिद्दीकी, डॉ. वसिम शेख, डॉ. अमोल पलके,प्रा.डी. एन. मिंधर, अशोक वरूडे, पुंडलिक घोडके, सय्यद नजाकत, डॉ. अबरार उल हक, अनिल सपकाळ, बाबासाहेब बनसोड, कल्याण देवकते, महेश टेकने, निलेश बिल्लाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांसोबत विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे लाभार्थ्यांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपुर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांस थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्याची एकरक्कमी परतावा योजना दि.३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानूसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीनी या योजनेचा फायदा घेवून कर्जमुक्त व्हावे, अधिक माहितीसाठी पात्र लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जालना येथे संपर्क क्रमांक ०२४८२ -२२३४२० यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# संक्षिप्त

### जिल्हाधिकारी यांची कुलभैय्या अनाथालयास भेट देवून पाहणी केली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहरातील सिरसवाडी रोडवर टी. व्ही. सेंटर जवळ महिला व बालविकास कार्यालयाकडून विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या कुलभैय्या अनाथालयाची (शिशुगृहाची) जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी भेट देऊन पाहणी केली.सदरील शिशुगृहात ० ते ६ वर्षापर्यंतच्या कुमारी मातांची मुले, मुलांमध्ये ज्यांचे आई-वडील दोघेही मृत आहेत अशी अनाथ मुले, जन्मानंतर पालकांनी सोडून दिलेली किंवा रस्त्यावर, रुग्णालयात आढळलेली मुले यात ,कायद्याच्या संरक्षणाखालील मुले यात बाल न्याय (संरक्षण व काळजी) अधिनियम २०१५ अंतर्गत येणारी मुले, जसे की विशेष काळजीची गरज असलेली मुले ज्यांना विशेष काळजी व सुविधा आवश्यक असतात यांचा समावेश होतो. सद्यस्थितीत या ठिकाणी ३ मुली आहेत. व यांची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी याठिकाणी मुलांना बालस्नेही वातावरण निर्माण करणे, मुलांना खेळणी उपलब्ध करुन देणे तसेच परिसरात मुलांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे याबाबत आदेशित केले. तसेच जिल्हातील दानशूर व्यक्ती, सामाजिक स्वयंसेवी संस्था यांनी याठिकाणी राहत असलेल्या मुलांना मदत करण्याचे आवाहन केले. महिला व बालविकास कार्यालयाकडून या मुलींना दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी जिल्हा महिला बालविकास अधिकारी राजेंद्र कड, परिविक्षा अधिकारी अमोल राठोड यांच्या सह शिशुगृहातील कर्मचारी उपस्थित होते.

### जालना कृषी उत्पन्न बाजार समितीला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देवून पाहणी केली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार पेठेतील फळे व भाजी मार्केटला प्रत्यक्ष भेट देवून येथील सोयी-सुविधांची पाहणी केली. यावेळी बाजार परिसराच्या पाहणी दरम्यान आवारातील अस्वच्छतेबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करुन, फळे व भाजीपाला मार्केटची दररोज स्वच्छता करणेबाबत बाजार समितीला निर्देश दिले. यावेळी पाहणी दरम्यान अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, कृषी उपसंचालक संजय कायंदे, बाजर समितीचे प्रशासक परमेश्वर वरखडे आणि सचिव भरत तनपुरे आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी सेल हॉलमध्ये काही व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केल्याबाबतची तक्रार केली असता, संबंधीत व्यापाऱ्यांना तात्काळ अतिक्रमण खाली करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी दिले. तसेच यावेळी जालना बाजार समितीच्या कार्यालयास भेट दिली असता, उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांनी समाधानकारक उत्तरे न दिल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कार्यालयीन कामकाजात तात्काळ सुधारणा करण्याचे निर्देश दिले. बाजार समितीचे पर्यवेक्षक, निरीक्षकांनी सकाळी ७.३० ते ३.३० वाजेपर्यंत तर अधिकारी-कर्मचारी यांना सकाळी ९.४५ ते सायं. ६.१५ वाजेपर्यंत बाजार परिसरात उपस्थित राहण्याबाबात सुचित केले. यावेळी त्यांनी बाजार समितीच्या प्रशासनास सूचना करुन शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा कडता, वराई व पैसा घेण्यात येवू नये अशा स्पष्ट सुचना दिल्या. जे आडते कडता, वराई व पसा घेतील. त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. ज्या आस्थापनेकडे विद्युत देयक व इतर येणे थकीत आहे. त्यांच्याकडून सक्तीने वसुल करण्याबाबतच्या सुचनाही त्यांनी केल्या. बाजार समितीच्या आवारात संरक्षण भिंत असून, ती संरक्षण भिंत ज्या ठिकाणी तोडून रस्ता केला आहे. तो रस्ता बंद करण्याबाबत बाजार समितीस निर्देश दिले. तसेच बाजार समितीच्या दैनंदिन कामकाजात सुधारणा करण्याच्या सूचना ही यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी बाजार समितीचे प्रशासक परमेश्वर वरखडे व सचिव भरत तनपुरे यांना केल्या.

### शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर वेळेत अर्ज करावेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया सन २०२५-२६ अंतर्गत रब्बी हंगामासाठी पीक प्रात्यक्षिकातंर्गत जालना जिल्ह्यास मोहरी या पिकासाठी लक्षांक प्राप्त आहे. तसेच राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान अंतर्गत कडधान्य, तृणधान्य, भरड धान्य तसेच व्यापारी पिक ऊस अंतर्गत ऊस हरभरा आदि घटकासाठी प्राप्त लक्षांकानूसार शेतकरी गटांना पिक प्रात्यक्षिकाचा लाभ मिळणार आहे. या घटकांसाठी अर्ज कर ण्याची प्रक्रिया पुर्णपणे ऑनलाईन असून उत्सुक शेतकरी गटांनी या संधीचा लाभ घेवून आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे पीक उत्पादनात वाढ करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर वेळेत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ विविध योजनांच्या लाभासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय अंतर्गत मुख्य कंपनी व १३ उपकंपनी अंतर्गत लघु उद्योग व्यवसायकरीता व शिक्षणाकरीता कर्ज पुरवठा केल्या जातो. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता विविध योजनांचे उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. या योजना पेट कर्ज योजना मर्यादा १ लाख, २० टक्के बीज भांडवल योजना मर्यादा ५ लाख रुपये, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना मर्यादा १५ लाख रुपये, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना मर्यादा २० लाख रुपये, गट कर्ज व्याज परतावा योजना मर्यादा २० लाख रुपये, महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना. या योजनेच्या अधिक माहितीसाठी पात्र लाभार्थ्यांनी जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जालना येथे संपर्क क्रमांक ०२४८२ -२२३४२० यावर तसेच् .ीललषवल.ेस संपर्क करण्याचे तसेच योजनेच्या लाभार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813